**University Grants Commission**
**Western Regional Office**
**Ganeshkhind, Pune-411 007**

# Submission of Final Report and Utilization Certificate of

# Minor Research Project

In the Faculty of Social Science

(Economics)

File No.-23-2950/11(WRO) Dated 19 Sep. 2012

Amount Sanctioned Rs.85,000/-

Project Title

## "The Study of Unorganized Sector in Labours "

**असंघटित क्षेत्रातील श्रमिकांचे अध्ययन**

By

**Dr. Jayram V. Gaikwad**
Deptt. of Economics
Shri Shivaji College,
Morshi Road, Amravati-444603.

**University Grants Commission**
**Western Regional Office**
**Ganeshkhind, Pune-411 007**

# Summary of Findings

## Project Title

## "The Study of Unorganized Sector in Labours "

## असंघटित क्षेत्रातील श्रमिकांचे अध्ययन

By

**Dr. Jayram V. Gaikwad**
Deptt. of Economics
Shri Shivaji College,
Morshi Road, Amravati-444603

## Enclosure - 3

## Summary of the finding

असंघटित क्षेत्रातील श्रमिकांचे अध्ययन हा विषय घेऊन अमरावती जिल्ह्यातील श्रमिकाच्या संदर्भातील विविध समस्यांचा अभ्यास केला असता त्यांच्या संदर्भामध्ये खालील निष्कर्ष प्राप्त झाले आहेत.

१) भारतामध्ये असंघटित क्षेत्रामध्ये श्रमिकाचे प्रमाण जवळपास ९३ टक्के आहे. पुरुषांप्रमाणे स्त्रियांनाही विणकाम, बीडी कामगार, बांधकामामध्ये शेतीमधील विविध कामे, कारखान्यामधील कामे, व्यापार व वाहतूक क्षेत्रातील विविध सेवा, खाणकाम, घाऊक व किरकोळ व्यापार, वाहतूक आणि साठवणूक व्यवस्था, शिवणकाम व एम्ब्रॉयडरीची कामे, पापड आणि लोणचे इत्यादी कामे करावी लागतात.

२) असंघटित क्षेत्रामधील श्रमिकांचे मोठ्या प्रमाणावर स्थंलातरण होत आहे. श्रमिकांना रोजगारीच्या संधी निमयित उपलब्ध होत नसल्याने अनेक श्रमिकांना रोजगारासाठी स्थंलातरण करावे लागते. बहुतेक वेळा शहराच्या ठिकाणी स्थंलांतरण होतांना आढळून येते.

३) नॅशनल सॅम्पल सर्व्हे या संघटनेने २००४-२००५ मध्ये संघटित आणि असंघटित क्षेत्रातील रोजगार संधीचा सर्व्हे केला असता या दोन्ही क्षेत्रातील रोजगार ४५.९ करोड इतका होता त्यापैकी २.६ करोड रोजगार संघटित क्षेत्राशी संबंधीत तर उर्वरीत ४३.३ करोड रोजगार असंघटित क्षेत्राशी संबंधित होता. विशेष म्हणजे शेतीशी संबंदित २६.९ करोड रोजगार असून २.५७ करोड रोजगार बांधकाम विभागाशी संबंधित होता.

४) शेती क्षेत्रावर ९७.८६ प्रतिशत श्रमिक अवलंबून आहेत. पुरुषाच्या बरोबरीने स्त्रिया काम करतांना दिसतात. पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांना मिलणारे वेतन कमी आहे. २५ प्रतिशत स्त्रिया गरोदर आणि बाळतंपणाच्या कठिण काळात सुद्धा आपल्या परिवारासाठी कामे करतांना आढळून आल्यात.

५) शेती क्षेत्राशी अत्यंत जिव्हाळ्याचे संबंध असल्याचे ८८ टक्के श्रमिक म्हणतात. ग्रामीण भागातील रोजगाराचे साधन म्हणून शेतीच आहे. शेतीशिवाय कोणतेही उद्योग निर्माण न झाल्यामुळे शेतीवरील अवलंबित्व अधिक आहे.

६) २०११ जनगणनेनुसार महाराष्ट्रातील एकूण श्रमिकांची संख्या ५.१० कोटी इतकी आहे. त्यापैकी संघटित क्षेत्रात काम करणाऱ्या श्रमिकांची संख्या ९ टक्के म्हणजे ४५.९० कोटी आहे. तर

असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांची संख्या ९१ टक्के म्हणजे ४ कोटी ६४ लाख ११ हजार इतकी आहे. म्हणजेच बहुसंख्य कामगार असंघटित क्षेत्रात काम करतांना आढळतात.

७) महाराष्ट्रातील दुकाने व आस्थापना अधिनियमाखाली १९ लाख आस्थापना नोंदणीकृत असून सुमारे २५ लाख श्रमिक काम करतात तसेच या अधिनियमाच्या बाहेर असणाऱ्या कारखान्यांची संख्या तेवढीच आहे तसेच राज्यातील १.२१ कोटी शेतकऱ्याकडे जवळपास २.४० कोटी शेतमजूर काम करतात. ४० लाख मालकाकडे जवळ-जवळ २० लाख घरेलू कामगार काम करतात. राज्यात बांधकाम व तत्सम क्षेत्राशी निगडीत काम करणाऱ्या मजुरांची संख्या ३० लाखाहून अधिक आहे. माथाडी अधिनियमाखाली ३४ मंडळ कार्यरत असून त्यामध्ये २ लाखाहून अधिक माथाडी कामगार आहेत. त्याचबरोबर राज्यातील ६ सुरक्षा रक्षक मंडळामध्ये जवळपास ३२ हजार सुरक्षा रक्षक काम करतात. नाका कामगार रस्त्यावरील फेरीवाले यांची ही संख्या लाखाच्या वर आहे. थोडक्यात राज्यातील श्रमशक्ती व कार्यशक्ती याचा विचार करता अधिकतम म्हणजेच ९१ प्रतिशतपेक्षा जास्त लोकसंख्या असंघटित क्षेत्रामधील विविध व्यवसायामध्ये काम करतांना आढळते.

८) असंघटित क्षेत्रातील नमुना श्रमिकांच्या कुटुंबाचा आकार साधारणत मोठा आहे. १ ते ४ कुटुंबातील सदस्य संख्येची ३५ कुटुंबे म्हणजेच २५ टक्के आहेत. ५ ते ७ कुटुंबातील सदस्य संख्येची ७५ कुटुंबे म्हणजेच ५३.५७ टक्के असून ७ पेक्षा जास्त सदस्य असलेले कुटुंब ३० म्हणजेच २१.४३ टक्के आहे. याचाच अर्थ असंघटित क्षेत्रातील श्रमिकांच्या कुटुंबामध्ये सदस्य संख्या अधिक आहे. अधिक उत्पन्न मिळविता यावे यासाठी सदस्य अधिक असावे असा समज असल्यामुळे कुटुंबाचा आकार मोठा असल्याचे स्पष्ट होते.

९) असंघटित क्षेत्रातील श्रमिकांच्या वयाच्या संदर्भात जास्त वयाची श्रमिक या क्षेत्रात काम करतांना आढळतात. नमुना असंघटित क्षेत्रातील श्रमिकांच्या वयोरचनेचा अभ्यास केला असता साधारणत १५ ते ३५ वयोगटामध्ये २० टक्के ३६.४५ वयोगटामध्ये ६० म्हणजे ४२.८६ टक्के ४६ ते ६० वयोगटामध्ये ४५ टक्के म्हणजेच ३२.१४ टक्के आणि ६१ पेक्षा जास्त वयोगटामध्ये १५ श्रमिक म्हणजे १०.७१ टक्के श्रमिक करीत असल्याचे दिसून येते. अर्थव्यवस्थेमधील चित्र आहे. शेती व तत्सम व्यवसायामध्ये ४५ पेक्षा जास्त वयाची श्रमिक संख्या अधिक असून बांधकाम, व्यापार आणि इतरसेवा या प्रकारामध्ये १५ ते ४५ वयोगटातील श्रमिकांची संख्या अधिक असल्याचे स्पष्ट होते.

१०) अमरावती जिल्ह्यातील असंघटित क्षेत्रातील श्रमिकांचे अध्ययन करीत असतांना साधारणत तालुक्याच्या अथवा जिल्हा मुख्यालय असलेल्या ठिकाणी श्रमिकांना कामाच्या संधी अधिक आहेत. संधीची उपलब्धता अधिक असल्याने रोजगार आणि उत्पन्न ग्रामीण भागातील श्रमिकांच्या तुलनेत अधिक मिळते. बांधकाम व्यवसाय, छोटे व मोठे कुटीर उद्योग, कुली व हमाल कामगार, माथाडी कामगार, कारखान्यामधील विविध कामे, विजनिर्मिती प्रकल्प आणि खाणकाम, शिवणकाम इत्यादी क्षेत्रामध्ये या श्रमिकांना कामे मोठ्या प्रमाणावर प्राप्त होतात.

११) नमुना असंघटित क्षेत्रातील कामगारांच्या निवासाविषयी माहिती मिळविली असता निवासाची स्थिती अतिशय दयनीय आहे. कुडाचे व तट्याचे २७.१४ प्रतिशत, मातीचे ३३.५७ प्रतिशत, माती व विटांचे २८.५७ प्रतिशत आणि १०.७२ प्रतिशत विटा व सिमेंटचे घर आहे. शहरी भागामध्ये झोपडपट्टीमध्ये राहणाऱ्या श्रमिकांचे प्रमाण ६० टक्के असून उर्वरित ४० टक्के स्वतःच्या घरात, भाड्याच्या घरात श्रमिक राहतात. ग्रामीण भागामध्ये ६५ टक्के मातीच्या घरात व कुडाच्या घरात राहत असून ३५ टक्के माती व विटाच्या घरामध्ये राहतात. ग्रामीण भागातील घरामध्ये मुलभूत सुविधाचा अभाव आढळतो. रस्ते, पाणी, वीज शौचालय यासारख्या मुलभूत बाबी आढळत नाही. शहरामधील झोपडपट्टीमध्ये राहणाऱ्या श्रमिकांच्या निवासाबातही अशीच स्थिती पहावयास मिळाली. १ रुमचे २ रुमचे साधे मातीचे घर ज्यांना खिडक्या नाहीत, सांडपाण्याची व्यवस्था नाही. अशा घरामध्ये हा वर्ग राहतो. घराच्या आजुबाजुला अतिशय घाणेरडे कचऱ्याचे ढीग, नाल्याचा अभाव, रस्त्याचा अभाव असल्याने त्याचा परिणाम त्यांच्या आरोग्यावर होतो.

१२) असंघटित क्षेत्रातील नमुना श्रमिकांचे मालकासोबतचे संबंध कश्या स्वरुपाचे आहे याविषयी माहिती संकलित केली असता ७८.५७ टक्के श्रमिकांनी संबंध प्रस्थापित होत नाहीत असे सांगितले कारण एकाच मालकाकडे कायम काम मिळत नसल्यामुळे मालक-कामगार यांच्यात कायम सलोख्याचे संबंध पहावयास मिळत नाही तसेच शहरी भागापेक्षा ग्रामीण भागामध्ये मालक व मजुर यांच्या मोठ्या प्रमाणावर संबंध असल्याचे आढळून आले.

१३) असंघटित क्षेत्रामधील कामगारांचे समाजामध्ये स्थान, पत प्रतिष्ठा याविषयी माहिती मिळविली असता ८५ टक्के कामगारांनी नकारार्थी उत्तर दिले. केवळ १५ टक्के कामगारांनी समाजामध्ये सन्मान दिला जातो असे सांगितले.

१४) नमुना असंघटित क्षेत्रातील श्रमिकांच्या रोजगारीच्या स्वरुपाची वर्गवारी केली असता शेतीमध्ये ८७.८६ टक्के उत्पादनाच्या क्षेत्रामध्ये १० टक्के बांधकाम क्षेत्रामधील ०५ टक्के, घाऊक व किरकोळ व्यापामध्ये २.८६ टक्के सामाजिक व वैयक्तिक प्रकारच्या सेवामध्ये ४.२८ टक्के रोजगार मिळत असून सर्वात जास्त काम शेती व तत्सम क्षेत्रामध्ये मिळत असल्याचे स्पष्ट होते.

१५) नमूना असंघटित क्षेत्रातील श्रमिकांच्या दारिद्र्याचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला असता जवळपास ८५.७१ टक्के श्रमिकाकडे सार्वजनिक वितरण प्रणालीचे राशनकार्ड व दारिद्र्य रेषेचे कार्ड आहे. १४.२९ टक्के श्रमिकाजवळ कार्ड नाही. उत्पन्नामध्ये नियमितपणा नसल्यामुळे त्याचे जीवन दारिद्र्यामध्ये असल्याचे स्पष्ट होते.

१६) नमुना असंघटित क्षेत्रातील श्रमिकांचा शैक्षणिक स्तर तपासून पाहण्याचा प्रयत्न केल्या असता स्वतः श्रमिक निरक्षर आहेत परंतू आपल्या मुलांना जवळच्या शाळेत पाठवित आहेत. शिक्षणाचे महत्त्व समजल्याने आपल्या मुलाला शाळेमध्ये शिकविण्याचे काम करीत आहे. या क्षेत्रातील १४.२९ टक्के श्रमिक निरक्षर ३७.१४ टक्के प्राथमिक शाळा १५ टक्के माध्यमिक शाळा २०.०० टक्के उच्च माध्यमिक शाळा २१.०० टक्के व पदवी पर्यंत शिक्षण प्राप्त केलेले १३.५७ टक्के आहेत. स्त्रियांचा वर्ग मोठ्या प्रमाणावर निरक्षर असल्याचे अध्ययनामध्ये दिसून आले.

१७) नमूना १४० असंघटित क्षेत्रातील श्रमिकाची निवड करून त्याचे धार्मिक वर्गीकरण केले असता सर्वधर्मीय कुटुंब या असंघटित क्षेत्रामध्ये काम करतांना आढळून आलेत. साधारणपणे ५८.५७ टक्के हिन्दूधर्मीय, २४.२९ टक्के मुस्लिम धर्मीय, ११.४३ टक्के बोद्ध धर्मीय आणि इतर धर्माचे ५.७१ टक्के कुटुंब या क्षेत्रातील विविध व्यवसायामध्ये कार्य करीत आहेत.

१८) नमूना श्रमिकाकडील कुटुंबामध्ये मनोरंजनाची साधने आहेत काय? असे विचारून माहिती मिळविली असता ५० टक्के श्रमिकाकडे टी.व्ही. मोबाईल व कॉम्प्यूटर २१.४३ टक्के श्रमिकाजवळ रेडिओ २१.४३ टक्के आणि उर्वरीत सीडी प्लेअर, टेप इत्यादी ७.१४ टक्के लोकांचे या माध्यमातून मनोरंजन होत असल्याचे स्पष्ट होते.

१९) स्वच्छतागृहे व शौचालय सुविधा ग्रामीण भागामध्ये कमी प्रमाणात उपलब्ध असून शहरी भागातील श्रमिकाच्या घरी ह्या सुविधा आढळतात. ग्रामीण भागातील ४० टक्के श्रमिकाच्या घरी या सुविधा असून शहरी भागात ७२.१ श्रमिकाकडे वरील सुविधा आढळतात. स्वच्छ भारत सुंदर भारत या घोषवाक्याचे या क्षेत्रात कमतरता दिसून येते म्हणजेच सरासरी ५५.१ टक्के श्रमिकाकडे वरील सुविधा असून ४५.१ श्रमिकांच्या घरी शौचालय व स्वच्छतागृहे नाहीत ही गंभीर बाब होय.

२०) सरकारी योजनाबद्दल नमूना असंघटित श्रमिकांना माहिती विचारली असता समाधानकारक उत्तरे प्राप्त झालेली नाहीत. शासनाच्या केलेल्या योजनेचा आपल्याला लाभ मिळाला काय? शासनाकडून आपल्याला घर बांधून मिळाले काय ? आरोग्याच्या बाबतीत कार्ड मिळाले होते काय? सरकारी आर्थिक सहाय्य अथवा मदत मिलाली काय ? असे प्रश्न विचारले असता शासनाकडून ४० टक्के श्रमिकांना लाभ झालेला असून उर्वरीत ६० टक्के श्रमिकांना सरकारी योजनेचा लाभ मिळालेला नाही असे श्रमिकांनी सांगितले.

२१) असंघित क्षेत्रातील श्रमिकांच्या विविध समस्यांचा अभ्यास केला असता त्यांच्यासमोर विविध समस्या आहेत. नियमित रोजगार मिळत नाही असे २८.५७ टक्के, कर्जबाजारीपणा व दारिद्र्याची समस्या ८.५८ टक्के, मजुरीचे दर कमी आहे असे ५७.१४ टक्के आणि कामाच्या ठिकाणी असुविधा आहे असे ५.७१ टक्के श्रमिकाचे म्हणणे आहे.